**आदेश** 313.

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ जुलै, २०१९

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. या नियमाला "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम, २०१९" असे संबोधण्यात यावे.

२. "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ४ चे उपखंड (२) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

**शारीरिक चाचणी (५० गुण) :-**

जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : १० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल :-**

**(अ) पुरुष उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | १६०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

**(ब) महिला उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | ८०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

ed by CamScanner

प्रति१२०)

**स्पष्टीकरण** :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : १० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० (१०X१०=१००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० (५X१०=५०) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

(व्यं.मा.भट)
शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner

# ORDER

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated :- 04 July 2019.

Maharashtra Police Act.

No.RCT-1818/CR-313/pol-5A. - In exercise of the powers conferred by clause (b) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Second Amendment) Rules, 2019.
2. In rule 4 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, for sub-rule (2), the following sub-rule shall be substituted, namely :-

The candidates securing a minimum of 35% marks (33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:10 of vacancies advertised in the respective catagories. The physical test will be of a total 50 marks as follows, namely:-

**Physical Test (50 marks)—**

**(A) Male Candidates :**

| | | |
|---|---|---|
| (A) | 1600 Meters Running | 30 Marks |
| (B) | 100 Meters Running | 10 Marks |
| (C) | Shot Put | 10 Marks |
| | ***Total Marks*** | ***50Marks*** |

**(B) Female Candidates :**

| | | |
|---|---|---|
| (A) | 800 Meters Running | 30 Marks |
| (B) | 100 Meters Running | 10 Marks |
| (C) | Shot Put | 10 Marks |
| | ***Total Marks*** | ***50Marks*** |

**Explanation** :- Candidates securing a minimum of 35% marks ( 33 % marks in respect of Backward Class category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:10 of the vacancies advertised in the respective catagories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste Category and 5 vacancies in the Scheduled Tribes Category, then 100 (10 X 10 = 100) candidates will be listed on merit in the Scheduled Caste Category and 50 (5 X 10=50) candidates, will be listed in the Scheduled Tribes Category. However, all candidates in the Scheduled Caste Category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 100 rank shall be eligible to be called to appear for a Physical Test. Similarly, all Scheduled Tribes Category candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 50th rank will be eligible to be called to appear for a Physical Test.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(V. M. Bhat)
Deputy Secretary to Government.

Scanned by CamScanner